लोणावळा नगरपरिषद हद्दीतील खंडाळा तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेकडून राबविण्यात येणा-या प्रकल्पातील कामासाठी निधी मुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१९/प्र.क्र.१३६/तां.क.२
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ ऑगस्ट, २०१९

वाचा -

१) पर्यावरण विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय,दिनांक: ११ मार्च, २०१३.
२) दिनांक २९ जुलै,२०१५ रोजीच्या सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३) मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांचे पत्र क्र. जावक क्र.लोनप ५/स.सं.यो/प्रा.आ.बै/२०१६-१७/२८६, दिनांक २७.६.२०१६
४) मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांचे पत्र क्र. जावक क्र.लोनप ५/रा.स.यो/नि.बा./२०१६-१७/५०६, दिनांक २६.८.२०१६.
५) पर्यावरण विभागाचे पत्र क्रमांक रासयो २०११/प्र.क्र.११९/तां.क.३, दिनांक ३ सप्टेंबर, २०१६
६) मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांचे पत्र क्र. जावक क्र.लोनप ५/रा.स.सं. यो/२०१९-२०/२२८, दिनांक २१.५.२०१९.

प्रस्तावना -

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत लोणावळा नगरपरिषद, जिल्हा पुणे यांचेमार्फत प्राप्त “खंडाळा” तलावाच्या पर्यावरणीय संवर्धन प्रस्तावास संदर्भाधीन दिनांक ११ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त तलावाच्या संवर्धनाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेली कामे राबविण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ११ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे एकूण रु. ३२,००,०००/- (रु. बत्तीस लक्ष) व शासन निर्णय दिनांक ६ मार्च २०१७ रोजी रु.१,००,००,०००/- (रु. एक कोटी) असे एकूण रु.१,३२,००,०००/- (एक कोटी बत्तीस लक्ष फक्त) एवढी रक्कम मुक्त करण्यात आली होती. सदर रक्कमेचा पूर्णपणे विनियोग झाल्याबाबत संबंधितांनी उपयोगिता प्रमाणपत्र, कामाचा भौतिक व वित्तीय प्रगती अहवाल तसेच सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त लोणावळा नगरपरिषदेने सादर केले आहे. उपरोक्त कागदपत्राच्या आधारे तसेच एकूण खर्चाच्या अनुषंगाने लोणावळा नगरपरिषद हद्दीतील खंडाळा तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी झालेल्या खर्चास उर्वरित निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. राज्य योजनेखाली राज्य सरोवर योजनेंतर्गत लोणावळा नगरपरिषदेमार्फत सादर खंडाळा तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ११ मार्च,२०१३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे एकूण मंजूर निधी रु.५,३३,६४,६९०/- पैकी राज्य हिश्श्यापोटी एकूण रुपये ४,२६,९१,७५२/- (रुपये चार कोटी सव्वीस लक्ष एक्क्याण्णव हजार सातशे बावन्न फक्त) इतक्या रक्कमेस संदर्भाधीन दिनांक ३० मार्च, २०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. उक्त नमूद प्रस्तावनेतील बाब लक्षात घेता खंडाळा तलावाच्या

संवर्धनासाठी उर्वरित कामे राबविण्यासाठी एकूण रुपये १,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी फक्त) इतक्या रकमेस मान्यता देण्यात येत आहे

२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत लोणावळा नगरपरिषद हददीतील खंडाळा तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य हिश्श्यापोटी देय एकूण रुपये ४,२६,९१,७५२/- (रुपये चार कोटी सव्वीस लक्ष एक्क्याण्णव हजार सातशे बावन्न फक्त) एवढया रक्कमेपैकी या शासन निर्णयाव्दारे रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांना शासन निर्णयातील "प्रपत्र -ब" मधील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीच्या तसेच संदर्भाधीन दिनांक १३ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. यासाठी मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा (Chief officer, Lonavala municipal council, Pune) यांचे नांवे रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा.

४. लोणावळा नगरपरिषदेला अदा करावयाची रुपये १,००,००,०००/- (रु. एक कोटी फक्त) एवढी रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. शि. चं. शिर्के, कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सु. कि. निकम, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांना रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाव्दारे वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर प्रयोजनार्थ होणार खर्च हा मागणी क्र. यु-४, ३४३५- परिस्थितीकी व पर्यावरण ०४, प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध , (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२) , ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" या मुख्य-लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वर्षात अर्थसंकल्पित रु. १५,००,००,०००/- (रु. पंधरा कोटी) मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ मधील परिच्छेद क्रमांक ७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की दिनांक १८.४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु. क्र. ३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे.

६ अ) तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ.३ दिनांक ३०.६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. या शिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्राक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५ दिनांक १०.५.२०१६ अन्वये खालील बाबीची पुर्तता होत आहे.

१.शासन निर्णयातील परिच्छेद ७ मधील मुद्या क्रमांक १ व मुद्या क्रमांक ९ बाबत वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १८ एप्रिल २०१७ मधील परिच्छेद क्र.७ (अ) नुसार रु.५ कोटीच्या पर्यंतच्या अनावर्ती योजनेच्या खर्चात प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना आहेत.

२. खंडाळा तलावाच्या संवर्धनासाठी एकूण मंजूर निधी रु. रु.५,३३,६४,६९०/- (रु पाच कोटी तेहतीस लक्ष सौसष्ट हजार सहाशे नव्वद फक्त) पैकी राज्य शासनाचा हिस्सा रुपये ४,२६,९१,७५२/- (रुपये

चार कोटी सव्वीस लक्ष एक्क्याण्णव हजार सातशे बावन्न फक्त) शासनामार्फत उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी रुपये १,३२,००,०००/- (रु. एक कोटी बत्तीस लक्ष फक्त) एवढा निधी खर्च झाला असून निधीचा पुढील हप्ता रुपये रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतका निधी प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

३. मागील तीन महिन्यात कोणताही निधी मुक्त करण्यात आलेला नाही.

४. मागणी क्रमांक यु-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण , ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनेतंर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२) , ३५ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५. लोणावळा नगरपरिषदेचे पर्यावरण विभागाकडे कोणतेही येणे बाकी नाही.

६. उपरोक्त शसना निर्णयाच्या “अ” मधील परिच्छेदातील ६,७,८,९ या बाबी लागू नाहीत.

८. उपरोक्त शासन निर्णयामध्ये वित्त विभागाचे परिपत्रक क्र अर्थंस २०१८/प्र.क्र६९/अर्थ-३ दिनांक २.४.२०१८ अन्वये ३१ वेतनेतर सहायक अनुदाने या बाबी खालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

९. वित्त विभागाचे परिपत्रक क्र अर्थंस २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दिनांक ०८.०७.२०१९च्या सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,५,६,७ या प्रकरणी लागू नाही. तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की नियोजन व वित्त विभागाची सहमती घेण्यात आली आहे.

१०. वित विभागाचे परिपत्रक क्र.अर्थंस २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ तपासणी सूचीमधील अ.क्र. १,२,४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच सपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ५ ते १० या प्रकारणी लागू नाही.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२७१७३१२६१८०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shuddhodhan D Aher

Digitally signed by Shuddhodhan D Aher
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19193e305825f30c0c7381430cc0f9fc9d9e4c47c2406ef9eca6ab6b77af1844, serialNumber=d9ed3af978d744c807b97e5551edcd2ab6f11c5495f5d6ef4863887d2775315c, cn=Shuddhodhan D Aher
Date: 2019.08.27 17:42:14 +05'30'

(शु. द. आहेर)
उप सचिव, पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र १/२,मंबई/ नागपूर.
४. मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद.
५. जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, रायगड
६. अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.

७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
११. प्रधानसचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१२. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१३. नगर पंचायत संचालनालय, वरळी , मुंबई
१४. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती.